नि.दि.दा.क्र.५४/२०१६
वि.
वादी तर्फे सा.क्र.३
(नि.क्र.८५)

//०७ //

**प्रतिवादी क्रं.३ तर्फे श्री. आर.ई.भुरकापल्ले वकिल यांच्यामार्फत उर्वरीत उलटतपास शपथेवर सुरु.**

**९.** हे खरे की, मी लक्ष्मण चाटे यांच्या गाडीवर चालक म्हणून काम करतो. हे खरे की, मी बांधकाम गवंडयाकडे सध्या काम करतो. हे खरे नाही की, सन २००६ ते २००९ या काळात मी लक्ष्मण चाटे यांच्या गाडीवर चालक म्हणून काम करतो. हे खरे नाही की, आज रोजी मी, लक्ष्मण व त्यांचा भाऊ यांच्याबरोबर साक्ष दयायला आलो.

**१०.** भागीरथीबाई यांना मंचक याने दि.०७/०४/२०१५ रोजी रु.४,५०,०००/- रक्कमेचा धनादेश माझ्यासमोर दिला यास माझे सांगणे की मला त्याबद्दल माहिती नाही. दुसरा धनादेश रु.५०,०००/- रक्कमेचा माझ्यासमोर दि.०८/०४/२०१५ रोजी दिला याबद्दल मला माहिती नाही. सदर रक्कम प्लॉटच्या व्यवहारापोटी दिली याबद्दल मला माहिती नाही. दि.०८/०४/२०१५ रोजी सदर दोन्ही धनादेशाची रक्कम भागीरथीबाईच्या महाराष्ट्र ग्रामीण बँक खात्यामध्ये जमा झाली याबद्दल मला माहिती नाही. ती रक्क्म भागीरथीबाईने बँकेतून काढली व बाबूराव चाटे यांना दिली याबद्दल मला माहिती नाही. हे खरे नाही की, रक्कम दिल्यानंतर झालेले खरेदीपत्र कायमस्वरुपी मंचकच्या नावे करण्यात आले. खरेदीपत्र सुरक्षीततेपोटी झाल्याचा लेखी दस्त झालेला नाही. हे खरे की, खरेदीपत्रात सदर दस्त सुरक्षीततेसाठी दिला असा मजकूर लिहीलेला नाही. मंचक बोंडगे व भागीरथीबाई यांच्यातील खरेदीपत्र मी वाचलेले नाही. हे खरे की, खरेदीपत्रात मजकूर काय लिहीला आहे हे मी पाहिला नाही, मी फक्त त्यावर सही केली. लक्ष्मणच्या सांगण्यावरुन मी खरेदीपत्रावर सही केली हे खरे आहे. हे खरे की, ठरावाप्रमाणे पैसे कधी दयायचे ठरले होते हे मला माहिती नाही. बाबुराव चाटे हे किनगाव ग्रामपंचायतीत दोन वेळा सदस्य होते हे खरे आहे. बाबुराव चाटे हे किनगाव व परिसरात सावकारी करीत याची मला माहिती नाही. हे खरे की, बाबुराव चाटे यांची रक्क्म लक्ष्मण

चाटे यांना परत करायची होती. हे खरे की, त्यामुळे भागीरथीबाई सदरचा प्लॉट मंचक बोंडगे यांना दिला.

**११.** हे खरे की, शपथपत्रामध्ये किती तारखेचा उल्लेख केलेला आहे. दि.०४/०६/२०१५, ०७/०६/२०१५ अशा तारखांचा उल्लेख माझ्या शपथपत्रात उल्लेख आहे. या दोन्ही तारखांचा शपथपत्रात उल्लेख नाही. या तारखा लक्ष्मण व वकीलांच्या सांगण्यावरुन लिहील्या हे खरे नाही. हे खरे की, शपथपत्रातील तारखा मला सांगता येत नाही.

**१२.** दि. २६/०६/२०१५ रोजी मी, लक्ष्मण चाटे, संजय शिवपुजे अहमदपूर येथे दुय्यम निबंधक कचेरीत आलो यास माझे सांगणे की, मला तारीख आठवत नाही, मात्र आलो होतो. मी आल्यानंतर भागीरथीबाई संजय शिवपुजेला प्लॉटचा खरेदीपत्र करुन दिले. हे खरे नाही की, वादमिळकतीवर वादीचा ताबा होता. हे खरे नाही की, संजय व लक्ष्मण यांच्याकडे ट्रक होती. दि. ०९/१२/२०१५ रोजी खरेदीपत्र उलटवून दयायचे होते असे मी खोटे सांगतो हे खरे नाही. शपथपत्रातील मजकूर खोटा आहे हे खरे नाही.

**उलटतपास पुर्ण.** **श्रवणोत्तर स्विकृत**
**फेरतपास नाही.** समक्ष

**स्वाक्षरीत/-**
**( एस.एन.सरडे )**
**दिनांक १६/०१/२०२६.** **दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.**